ePaper
ठाकरे की शिंदे : कुणाच्या बाणाने रावन दहण होणार!
| वर्ष - 6 | अंक - 173 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 5 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews






# थकबाकीदारांना झटका!

## प्रशासन आक्रमक : कर संकलन विभागाकडून जप्तीची कारवाई सुरु







**।-पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने थकीत मालमत्ता धारकांबाबत कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. थकबाकी असलेल्या 21 मालमत्ता जप्त केल्या आहेत. यापैकी 12 मालमत्ता धारकांनी त्वरीत 92 लाख 93 हजार 473 रुपयांचा थकीत कर महापालिका तिजोरीत जमा केल्याची माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी दिली. तसेच जप्तीची मोहीम अधिक तीव्र करणार असल्याचा इशाराही देशमुख यांनी दिला आहे.**

शहरातील 50 हजारांपुढे थकबाकी असणाऱ्या 26 हजार 760, पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या व्यावसायिक 1 हजार 361 तर मालमत्ता कराचा एकदाही भरणा न केलेल्या 3 हजार 850 अशा 31 हजार 971 मिळकत धारकांना जप्तीच्या नोटीसा कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त देशमुख यांनी दिल्या आहेत. तसेच या मालमत्ता धारकांकडे तब्बल 631 कोटी रुपयांचा कर थकीत असल्याचेही देशमुख यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवड शहरात 5 लाख 79 हजार मिळकतींची नोंद आहे. चालू आर्थिक वर्षांत आत्तापर्यंत 362 कोटी रूपये कराचा भरणा केला आहे.

याबाबत माहिती देताना सहाय्यक आयुक्त देशमुख म्हणाले, चिखली आणि भोसरीमध्ये थकबाकी असलेल्या औद्योगिक आणि बिगरनिवासी 21 मिळकती जप्त केल्या आहेत. यापैकी 12 मिळकत धारकांनी त्वरीत 92 लाख 93 हजार 473 रुपयांचा थकीत कर भरला आहे. 9 मालमत्ता या सील केलेल्या आहेत. मालमत्ता सील केल्यानंतर यापैकी 5 जणांनी कराचा भरणा केला आहे. उर्वरित चार मालमत्ता धारकांनी अद्याप कराचा भरणा केला नाही. मालमत्ता जप्त केल्यापासून 21 दिवसांत कर न भरल्यास या मालमत्तांचा जाहीर लिलाव करण्यात येणार आहे.

### 1361 मालमत्तांची याच महिन्यात होणार जप्ती!

पाच लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या व्यावसायिक 1 हजार 361 मालमत्ता आहेत. थकबाकी असलेल्या या मालमत्तांची ऑक्टोबर महिन्यातच जप्ती करण्यात येणार आहेत. तसेच शहरातील 50 टक्यांपेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या सोसायट्यांची यादी सुरू आहे. अशा सोसायट्यामधील ज्या फ्लॅटधारकाची 1 लाखांपेक्षा अधिक थकबाकी आहे, अशा निवासी फ्लॅटच्या जप्तीचेही याच महिन्यात नियोजन करण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी सांगितले.

# एकविरा देवस्थानच्या प्रश्नांबाबत पाठपुरावा!

## डॉ. नीलम गोऱ्हे : 'बये दार उघड' मोहिमेची सांगता

**। पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



शिवसेना परिवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सर्व कुटुंबियांच्या श्रध्दास्थानी असलेल्या श्री. एकविरा देवीच्या दर्शनाने आज मनाला वेगळेच समाधान लाभले. एकविरा देवस्थानचे असलेले प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही लवकरच विधिमंडळात लवकरच एक बैठक घेऊ. या बैठकीसाठी स्थानिक शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते यांना निमंत्रित करण्यात येईल, असे प्रतिपादन आज विधान परिषद उपसभापती ना. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी येथे केले.

शिवसेना महिला आघाडी आणि युवासेना आयोजित 'बये दार उघड मोहीम' आज पुणे जिल्ह्यातील एकविरा देवीच्या दर्शनाने समाप्त झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

त्या म्हणाल्या, एकविरा देवीच्या मंदिरातील कळस चोरी झाल्याच्या प्रश्नांवर मी पाठपुरावा केला होता. पुढील वर्षीच्या नवरात्रात देवीच्या मूळ दागिन्यांसह पूजा व्हावी हीच इच्छा आहे. याबाबत मा. उच्च न्यायालयाने आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयाने योग्य ती कार्यवाही होण्यासाठी लक्ष घालावे, अशी विनंती यावेळी त्यांनी केली. पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण स्तरावर या परिसरातील जमिनींचा ताबा घेतल्याचे प्रश्न प्रलंबित आहे. यावर लवकरच बैठक घेणार आहे.

यावेळी शिवसेना उपनेत्या ज्योती ठाकरे, युवासेना पदाधिकारी शीतल शेठ, स्त्री आधार केंद्राच्या प्रमुख विश्वस्त जेहलम जोशी, स्थानिक शिवसेना पदाधिकारी मच्छिंद्र खराडे, सुरेश गायकवाड, अनिता गोणते, शैला खंडागळे, वेहेरगावच्या सरपंच अर्चना संदीप देवकर, पुणे महिला आघाडीच्या कल्पना थोरवे, अश्विनी शिंदे, अनिता परदेशी, ज्योती चांदेरे, अमृत पठारे, स्वाती रणपिसे, सुनीता रानवडे, रुपाली सुतार, पिंपरी चिंचवड येथील वैशाली मराठे, अनिता तुतारे, रोशनी जगताप, ज्योती भालके, वंदना वाल्हेकर, कामिनी मिश्रा, सुवर्णा मगर, प्रतीक्षा घुले, डॉ. वैशाली कुलथे, मुळशी तालुक्यातील सुरेखा तोंडे आदी महिला उपस्थित होत्या.

### खूप मारल्या गप्पा... आणि कुठे गेले आप्पा...

**मावळ तालुक्यात अनेकांनी लोकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला असल्याचे नाटक केले. आज मात्र त्यांची अवस्था 'खूप मारल्या गप्पा आणि कुठे गेले ...' अशी झाली आहे. मावळ वासियांच्या भावनांचा विचार न करता ते आज शिवसेनेची मूळ विचारधारा सोडून गेले आहेत. मात्र, आपण सर्व शिवसैनिक भक्कम असून यामुळे आपल्यावर कोणताही परिणाम होणार नाही, अशी टीका खासदार श्रीरंग बारणे यांचे नाव न घेता डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे.**

## पिंपरी-चिंचवड शहरात 12 पोलिसांचे अकाली निधन

# पोलिसांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर!

## पोलिसांना कोरोनापेक्षा इतर आजार जास्त बाधले...

। पिंपरी-चिंचवड
। महाईन्यूज।

**पिंपरी पोलिस ठाणे येथे नियुक्तीस असलेल्या एका फौजदाराचा नुकताच हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे पोलिसांच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याबाबत पिंपरी चिंचवडमध्ये मृत पावलेल्या पोलिसांची माहिती घेतली असता आत्तापर्यंत बारा पोलिसांचे अकाली निधन झाल्याच सांगण्यात आले यातील पाच कोरोनामुळे एक अपघात आणि इतर सहाजण आजारांना बळी पडले आहेत त्यामुळे पोलिसांना कोरोनापेक्षा इतर आजार जास्त बाधल्याचे बोलले जात आहे**



> **आरोग्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष नको पोलिसांनी स्वतःसह कुटुंबीयांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे सकाळी व्यायाम योगा केल्यास शरीरासोबत मानसिक आरोग्यदेखील सुदृढ राहण्यास मदत होईल.**
> **- अंकुश शिंदे पोलिस आयुक्त पिंपरी चिंचवड**

नंदकिशोर पतंगे (23) रा इंद्रायणीनगर भोसरी, असे मृत्यू झालेल्य उपनिरीक्षकाचे नाव आहे पतंगे हे पिंपरी पोलिस ठाण्यात नियुक्त होते मात्र दरम्यानच्या काळात त्यांना नियंत्रण कक्षाशी संलग्न करण्यात आले होते एका अर्जप्रकरणात हलगर्जी केल्याचा ठपक ठेऊन त्यांच्यावर ही तात्पुरती कारवाई करण्यात आली होती. नियंत्रण कक्षाला संलग्न केल्यापासून पतंगे तणावात असल्याचे त्यांचे सहकारी सांगतात पतंगे यांचा मृत्युमुळे पोलिस दलातील वातावरण चांगलेच ढवळून निघाले त्यांच्या मृत्यूनंतर उलटसुलट चर्चांना उधाण आले मात्र शिस्तीचे खाते अशी पोलिस खात्याची ओळख आहे त्यामुळे शिस्तीला तडा जाऊ नये यासाठी अशा प्रकारची कारवाईदेखील तितकेच गरजेचे असल्याचे जाणकार सांगतात

### आहाराच्या वेळा अनिश्चित

काही वेळेला अचानक बंदोबस्त किंवा पोलिस ठाण्यात गोंधळ होतो. त्या वेळी ड्युटीवर असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांना जास्त वेळ थांबावे लागते यामध्ये जेवणाची वेळ टळून जाते अनेकदा पोलिस हॉटेलमधून पार्सल मागवून खातात संतुलित आहाराकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे देखील पोलिसांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होऊ लागला आहे.

### प्रेमलोक पार्कचा धसका

पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारीदेखील नेहमी तणावात असल्याचे पाहावयास मिळते याला महत्त्वाचे कारण म्हणजे शहरातील उच्चपदस्थांची नागरिकांसाठी असलेली ओपन डोअर पॉलिसी पोलिस ठाण्यात समाधान न झाल्यास नागरिक थेट प्रेमलोक पार्क येथील आयुक्त कार्यालयात येऊन धडकतात येथील वरिष्ठ अधिकारी संबंधित प्रकरण ऐकून प्रभारी अधिकाऱ्यांना धारेवर धरतात नुकतेच अवैध धंद्यांच्या तक्रारीवरून दोन वरिष्ठ निरीक्षकांना नियंत्रण कक्षाशी संलग्न करण्यात आले होते. त्यानंतर चौकशी करून पुन्हा त्यांना मूळ ठिकाणी पाठवण्यात आले त्यामुळे प्रभारी अधिकाऱ्यांना प्रेमलोक पार्कचा चांगलाच धसका घेतल्याचे दिसून येत आहे.आरोग्याबाबत तक्रारी जाणवत असल्यास सर्वप्रथम उपचार घेणे महत्त्वाचे आहे ज्यामुळे पुढील धोके टाळता येतील.

### हतबल होऊ नये

तडकाफडकी बदली किंवा एखादी शिस्तभंगाची कारवाई झाल्यानंतर पोलिसांनी हतबल होऊ नये तसेच सर्वप्रथम स्वत च्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे कोरोनाशिवाय मृत पावलेल्या पोलिसांमध्ये अपघात वगळता सहा पोलिसांमध्ये आरोग्याबाबत हलगर्जपिणा असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. त्यामुळे पोलिसांनी कर्तव्यासोबतच आरोग्याबाबतही सतर्क राहणे अवश्यक आहे

### पोस्टिंगसाठी स्पर्धा

पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील पंधरा पोलिस ठाणी आणि तीन चौक्या अशा अठरा ठिकाणी पोलिस निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येते याव्यतिरिक्त गुन्हे शाखेची पाच युनिट अंमली पदार्थ, शस्त्र विरोधी खंडणी दरोडा गुंडाविरोधी आणि आर्थिक गुन्हे शाखा येथील पोस्टिंग महत्त्वाची मानली जाते तसेच वाहतूक शाखेच्या तेरा विभाग मिळवण्यासाठीदेखील चढाओढ असते पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तलयात एकूण पोलिस निरीक्षक हजर आहेत यांच्यात पोस्टिंगसाठी छुपी स्पर्धा असल्याचे पहावयास मिळते

---

# जेजुरीच्या पारंपारिक झेंडू बाजारात ८० रुपये किलोने झेंडूची खरेदी!

## फुलांचा तुटवडा असल्याने भाव वाढले

।पुणे। महाईन्यूज ।



श्रीक्षेत्र जेजुरी येथील पारंपारिक झेंडू बाजारात व्यापाऱ्यांनी ७० ते ८० रुपये किलो भावाने झेंडूच्या फुलांची खरेदी केली. ही फुले पुणे, पिंपरी -चिंचवड, मुंबई, ठाण्यासह राज्याच्या विविध भागात पाठवण्यात आली. झेंडूच्या बाजारात लाखो रुपयांची उलाढाल झाली. आपट्याची पानेही (सोने) बाजारात मोठ्या प्रमाणात आली होती. सोमवारपासूनच झेंडू बाजार भरला, परंतु बाजारात शेतकऱ्यांनी झेंडूची फुले विक्रीसाठी कमी आणल्याने व्यापाऱ्यांची निराशा झाली. अनेक व्यापारी खरेदी न करता माघारी गेले, मात्र मंगळवारी खंडेनवमी असल्याने सकाळपासूनच बाजारात पुरंदर तालुक्याबरोबरच इतर तालुक्यातील झेंडूची फुले विक्रीस आली. त्यामुळे बाजारात चांगली उलाढाल झाली. फुलांच्या प्रतवारीनुसार ७० ते ८० रुपये किलो भाव मिळाला. चांगला दर मिळाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान जाणवले. पुरंदर तालुक्यामध्ये पूर्वी झेंडूतील गोंडा या जातीचे उत्पादन घेतले जायचे, पावसावर अवलंबून असलेला हा गोंडा माळरानावरही चांगला फुलायचा, परंतु ही फुले जास्त वेळ टिकत नसल्याने आता सर्व शेतकरी झेंडूमधील सुधारित जातीच्या रोपांची लागवड करून उत्पादन घेत आहेत. दसरा-दिवाळीला हक्काचे पैसे मिळतात म्हणून बहुतांश शेतकरी झेंडूची लागवड करतात. अनेक शेतकऱ्यांनी मंगळवारी सकाळी ताजी फुले शेतातून तोडून विक्रीसाठी आणली त्यामुळे या फुलांना जास्त भाव मिळाला. पुरंदर तालुक्याच्या विविध भागात गेले महिनाभर मुसळधार पर्जन्यवृष्टी झाल्याने झेंडू पिकाचे नुकसान झाले आहे. नेहमीच्या तुलनेत यंदा निम्माच बाजार भरला, असे व्यापाऱ्यांनी सांगितले .येथून खरेदी केलेला झेंडू शहरी भागात टेम्पो, ट्रकने पाठवला जातो व तेथे झेंडूची किरकोळ स्वरूपात १५० ते २०० रुपये किलोने विक्री केली जाते. यातून व्यापाऱ्यांनाही चांगला नफा मिळतो.

# विद्यापीठ चौकातील उड्डाणपूलाच्या कामाला चार दिवस विलंब

।पुणे। महाईन्यूज ।



एनडीए चौकातील (चांदणी चौक) अतिरिक्त दोन मार्गिकांची कामे चालू आठवड्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे वाहतुककोंडी टाळण्यासाठी आनंदऋषीजी चौकातील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील) उड्डाणपूलाचे काम सुरू करण्याचा निर्णय महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पुणे मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटी – पीएमआरडीए) घेतला आहे. परिणामी या पूलाच्या कामाला आणखी चार दिवस विलंब होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शुक्रवारी (७ ऑक्टोबर) महापालिका, पीएमआरडीए आणि वाहतूक पोलीस यांची एकत्रित बैठक होणार आहे.

विद्यापीठ चौकात उड्डाणपूलाचे काम सुरू करण्याचे सर्व नियोजन पीएमआरडीएकडून पूर्ण करण्यात आले आहे. चांदणी चौकात पूल पाडण्याचे काम पूर्ण झाले असून अतिरिक्त दोन मार्गिकांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, ते पूर्ण होण्यास अद्याप काही दिवस लागणार आहे. याच कालवधीत विद्यापीठ चौकात पूलाचे काम सुरू केल्यास दोन्ही ठिकाणी वाहतूकीची कोंडी होऊन नागरिकांना त्रास होऊ शकतो. या सर्व गोष्टींचा विचार केला, तर काम सुरू केल्यानंतर नागरिकांची गैरसोय होऊ शकते. त्यामुळे ६ ऑक्टोबरऐवजी हे काम १० ऑक्टोबरपासून सुरू करावे, अशी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी सूचना केली आहे.

# मुळा नदी पुनरुज्जीवनाला गती!

## प्रशासक शेखर सिंह यांचा निर्णय : पिंपरी-चिंचवड महापालिकेतर्फे प्रकल्पाला मान्यता



**पिंपरी-चिंचवड । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

पिंपरी - चिंचवड महापालिकेच्या विविध विभागाकडील जुने व निरुपयोगी झालेले भंगार साहित्य ई-लिलावाद्वारे विक्री करणे तसेच महानगरपालिकेच्या परिसरात मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प पुणे महापालिकेसोबत संयुक्तरित्या राबविण्याबाबतच्या विषयाला आज झालेल्या बैठकीत प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

प्रशासक शेखर सिंह यांच्या उपस्थितीत आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत बैठक पार पडली.

स्थायी समिती आणि महापालिका सभेची मान्यता आवश्यक असलेल्या सुमारे १५ कोटी ८६ लाख रुपये खर्चाच्या विविध विषयांना आजच्या बैठकीत त्यांनी मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, उल्हास जगताप यांच्यासह विषयाशी संबंधित अधिकारी आणि विभाग प्रमुख उपस्थित होते.

या विषयांसह तरतूद वर्गीकरण आणि विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कामकाजाकरीता मानधनावरील कर्मचाऱ्यांच्या तसेच विविध कामांच्या मुदतवाढीच्या विषयांना देखील प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

### संगीत अकादमीतर्फे दिवाळी पहाट कार्यक्रम...

स्थायी समितीची मान्यता आवश्यक असलेल्या विषयांमध्ये विविध खर्चाच्या मान्यतेचा समावेश होता. यामध्ये निगडी येथील पीएमपीएमएल बस डेपो मध्ये बस चार्जिंग करीता उच्चदाब विद्युत पुरवठा घेण्याकरिता महापारेषण कंपनीस बे उभारणीच्या कामासाठी तसेच सुपरव्हिजन चार्जेस अदा करण्याबाबतच्या खर्चास, महापालिकेच्या नेहरू नगर व खराळवाडी येथील शाळा व इतर इमारतीचे रंगरंगोटी देखभाल दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामांच्या खर्चास, महापालिकेच्या संगीत अकादमी मार्फत "दीपावली पहाट २०२२" या कार्यक्रम आयोजनाबाबतच्या खर्चास स्थायी समितीची मान्यता आवश्यक होती त्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# 'चॅलेंजर' च्या गरब्याला महिलांसह आबालवृद्धांचा उत्साह

## अनिता काटे : दांडिया महोत्सवामुळे सोसायटीतील नागरिक एकत्र

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**पिंपळे सौदागर येथील सोसायटीतील नागरिक आणि भाविकांसाठी नवरात्रीनिमित्त सामाजिक कार्यकर्त्या सौ. अनिताताई संदीप काटे आणि निलेश काटे युवा मंच्या वतीने सलग तीन दिवस ' भव्य दांडिया महोत्सव २०२२ ' चे आयोजन करण्यात आले होते. गुजराती गरबा व लोकगीते यांच्यासोबतच साऊंड ट्रॅकवरील दांडिया नृत्य, सोबतच खास आकर्षण सारेगमपा गायक मयुरेश वाघ यांच्या गायनावर अक्षरशः तरुणाई थिरकली.**



### पारितोषिकाचे मानकरी असे आहेत...

या दांडिया महोत्सवात सहभागी प्रत्येकाला बक्षीस जिंकण्याची संधी होती. त्यात उत्कृष्ठ कपल, उत्कृष्ठ नृत्य (पुरुष), उत्कृष्ठ नृत्य (महिला), उत्कृष्ठ वेशभूषा (पुरुष), उत्कृष्ठ वेशभूषा (महिला), उत्कृष्ठ बाल नृत्य (मुलगा), उत्कृष्ठ बाल नृत्य (मुलगी), उत्कृष्ठ बाल वेशभूषा (मुलगा / मुलगी) यांच्यातील सर्वोत्कृष्ठ स्पर्धकाची श्रेणीनिहाय बक्षीसासाठी निवड करण्यात आली. महिलांमध्ये बक्षिसाच्या मानकरी सौ. अंजली मालकवडे, सौ. कल्याणी, वेदश्री रासने या ठरल्या.

आयोजनात हा महोत्सव अगदीच सरस ठरला. गेले तीन दिवस महिला भगिनीपासून आबालवृद्धांनी या महोत्सवाच्या माध्यमातून आनंद लुटला. यापुढे देखील अशाच प्रकारच्या महोत्सवाचे आयोजन करून सोसायटीतील नागरिकांना एकत्रित आणावे, असा मनोदय अनेकांनी व्यक्त केला, अशी माहिती आयोजक सामाजिक कार्यकर्त्या सौ. अनिताताई संदीप काटे यांनी दिली. हा महोत्सव (दि. ३० सप्टेंबर) ते (दि. २ ऑक्टोबर) एकूण ३ दिवस चॅलेंजर पब्लिक स्कुलच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. रंगीत दिव्यांची रोषणाई आणि सुमधूर संगीताच्या तालावर सहभागी स्पर्धकांसह नागरिकांनी मोठ्या जल्लोषात दांडियांचा आनंद लुटला.

या महोत्सवाचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माजी महापौर सौ. उषाताई उर्फ माई ढोरे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

त्यांनी शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून देवीची आरती केली. माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, उद्योजक संदीप काटे, निलेश काटे युवा मंचाचे अध्यक्ष निलेश काटे, आरती तुतारे, श्वेता खोरगडे, अनिता ज्ञानेश्वर काटे, गावातील ग्रामस्थ, विविध सोसायटीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवडमध्ये पाच ठिकाणी झाड पडल्याची घटना

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**



मंगळवारी संध्याकाळी पाच ठिकाणी झाड पडल्याच्या घटना घडल्या. अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पिंपरी मुख्यालयाने दिली. या पाचही घटनांमध्ये कोणत्याही माणसाला दुखापत झाली नाही.

संध्याकाळी 5 नंतर एक मोठे झाड डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक जवळील स्टेशन रोडवर, हॉटेल रत्ना जवळ पडले होते. झाड मोठे असल्याने वाहतूक कोंडी झाली होती. एक अग्निशमन बंब घटनास्थळी पाठविण्यात आला होता. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी झाड कापून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. संध्याकाळी साडेपाच वाजता चिंचवड स्टेशन भागात द्वारकादास जवळ एक झाड पडले होते. एक अग्निशमन बंब घटनास्थळी पाठविण्यात आला होता. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी झाड कापून रस्ता खुला करण्यात आला होता.

संध्याकाळी पिंपरी येथे एसएनबीपी शाळेजवळ रस्त्यावरती एक झाड पडले होते. एक अग्निशमन बंब घटनास्थळी पाठविण्यात आला होता. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी झाड कापून रस्ता करण्यात आला होता. संध्याकाळी पिंपरी येथील सेंट्रल मॉलच्या मागे असलेल्या श्रद्धा रेसिडेन्सी जवळील रोडवर दोन ते तीन ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्या होत्या. एक अग्निशमन बंब घटनास्थळी पाठविण्यात आला होता. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी त्या फांद्या हटवल्या. संध्याकाळी नवी सांगवी येथील सीएमई सोसायटीमध्ये एक झाड पडले होते. एक अग्निशमन बंब घटनास्थळी पाठविण्यात आला होता. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी झाड कापून रस्ता मोकळा करण्यात आला होता. पिंपरी चिंचवड आज संध्याकाळी पाच ठिकाणी झाड पडल्याच्या घटना घडल्या. अशी माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पिंपरी मुख्यालयाने दिली. या पाचही घटनांमध्ये कोणत्याही माणसाला दुखापत झाली नाही. संध्याकाळी 5 नंतर एक मोठे झाड डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक जवळील स्टेशन रोडवर, हॉटेल रत्ना जवळ पडले होते. झाड मोठे असल्याने वाहतूक कोंडी झाली होती. एक अग्निशमन बंब घटनास्थळी पाठविण्यात आला होता. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी झाड कापून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता.

## संपादकीय

# बंदी लादणे हा काय उपाय आहे का ?

***देशविरोधी कारवाई किंवा देशाची शांतता भंग करून हिंसक कृत्यात सहभागी संघटना यांच्यावर केंद्र सरकार कारवाई करीत असते . आवश्यक ती कारवाई झाल्यावर अशा संघटना आपले मिशन सोडत नाहीत.***

पदाधिकाऱ्यांची एक फळी तुरुंगात गेली की दुसरी फळी तो अजेंडा राबवायला मैदानात उतरत असते अशा वेळी सरकार या संघटनांवर बंदी का आणीत नाही अशी हाकाटी देशभर सुरु होते . देश पोखरणाऱ्या संघटनांची सर्व प्रकारची रसद तोडणे हे गृहखात्याचे प्रथम काम असते . एकाबाजूला रसद तोडणे आणि त्याचवेळी या प्रवृत्तींना मदत करणाऱ्या यंत्रणांचा शोध घेऊन त्यांच्यावर अंकुश लावणे आणि तरीही कारवाया सुरूच राहिल्या तर त्या संघटना किंवा विचारांवर बंदी आणणे या क्रमाने कारवाई केली जाते . सध्या पीएफआय वरील कारवाई झाल्यावर सरकार त्या दिशेने विचार करीत असल्याचे वातावरण दिसत आहे . एखाद्या संघटनेचा बंदोबस्त करण्यासाठी किंवा कायमचा बिमोड करण्यासाठी बंदी घालणे हा अंतिम आणि कायमस्वरूपी उपाय होऊ शकतो का यावर आपल्या देशात सध्या चर्चा सुरु आहे . बंदी हा काही व्यक्तींच्या ठराविक कारवाया थांबवण्याचा उपचार कदाचित ठरू शकेल मात्र एखाद्या विचारधारेवर नियंत्रण करण्याचा बंदी हा प्रभावी उपाय ठरू शकणार नाही असे अनेकांचे म्हणणे आहे . त्यासाठी देशातील

पुरोगामी वर्ग राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उदाहरण पुढे करीत आहेत .संघावर आजवर दोनवेळा बंदी लादण्यात आली होती . या दोन्ही बंदीतून संघ सहीसलामत बाहेर पडताना त्याचा विस्तार आधीच्या तुलनेत जास्त झाल्याचे दिसून आले . एखादी गोष्ट जेवढी दाबण्याचा प्रयत्न केला तेवढी ती उफाळून येण्याचा प्रयत्न करते या निसर्ग नियमाची सांगड त्याच्याशी घातली जात आहे . पीएफआयवर बंदी घालण्याची मागणी जे लोक करीत आहेत त्यात भाजप आणि संघ परिवार आघाडीवर असल्याचे दिसते . एखाद्या संघटनेवर बंदी घालणे हा मार्ग असू शकत नाही असा त्यावेळी युक्तिवाद करणारे संघ स्वयंसेवक किंवासमर्थक पीएफआय बाबत मात्र आपली जुनी भूमिका कशी काय सोडून देतात ? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे . समजा एखाद्या देशविरोधी संघटनेवर बंदी नको असेल तर त्यांच्या कारवाया रोखण्याचे कोणते मार्ग असू शकतात याचे मार्गदर्शन करताना सध्या कुणी विद्वान समोर येताना दिसत नाही . २००६ पासून पीएफआय कार्यरत असेल तर २०१४ साली सत्तेवर येताच भाजप सरकारने या संघटनेवर बंदी का घातली नाही ? असाही प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे . आजवर किमान भाजपशासित राज्यांमध्ये तरी तिला मोकळीक का देण्यात आली ? केरळ मधील ३० हत्या आणि उत्तर प्रदेशातील धार्मिक दंगलींमध्ये उघड झालेला सहभाग पाहता आजवर कारवाईसाठी एवढा विलंब का लावण्यात आला ?



## आनंदी सकाळ

# शुभस्य सीघ्रम...

जे काम शुभ, मंगल, पवित्र आणि चांगले आहे, ते तातडीने करावे. चांगलं म्हणजे काय तर ज्यामुळे स्वत:चे आणि समाजाचे अहित होणार नाही ते. ज्याचा इतरांना फायदा होणार आहे, ते काम सुरू करण्यास वेळ घालवू नये. डोळ्यातील कुसळ, पायातील काटा आणि मनातील संशय जितक्या लवकर काढू तेवढं चांगलं. मग ही कामं तातडीनेच करायला हवीत. मानवी मन कधी बदलेल हे सांगता येत नाही. त्यामुळं शुभ कामात वेळ घालवणे व्यर्थ. याबाबत एक कथा सांगतात. महारथी कर्ण एकदा दाढी करायला बसला होता, तेवढ्यात तेथे भिक्षुक आला. डाव्या हाताचा चांदीचा तांब्या कर्णाने त्याला दिला. तेव्हा कर्णाची दाढी करणारा सेवक म्हणाला, 'महाराज, दान उजव्या हातानं द्यायला हवे. तेव्हा कर्ण म्हणाला, 'डाव्या हातातून उजव्या हातात तांब्या जाईपर्यंत मन बदलले तर?'



## भूमिका

# घातक प्रवृत्तींचा सन्मान नकोच !




चार दिवसांपूर्वी देशभरात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेच्या १४ राज्यातील कार्यालयांवर धाडी टाकण्यात आल्यावर या संघटनेबाबत चर्चा सुरु झाली . देशात अशांतता निर्माण होईल अशा कृत्यात सामील असणाऱ्या संघटना कोणत्याही जाती धर्माच्या असो त्यांच्यावर कठोर कारवाई व्हायला हवी आणि पुन्हा देश तोडण्याची कल्पना सुद्धा डोक्यात येणार नाही अशी अद्दल कायद्याने घडवली पाहिजे अशी अपेक्षा लोक करायला लागले आहेत . धर्म, जात किंवा विचारधारेच्या माध्यमातून द्वेषाची पेरणी करणारा विचार दावा, उजवा किंवा मध्यम असला तरी त्याने देशाचे नुकसान होणार आहे हे लक्षात ठेवून संविधानाच्या चौकटीत बसून ज्यांना काम करायचे आहे अशाना भक्कम संरक्षण देत आपल्या देशाचा गाडा चालायला हवा अशी मागणी जनता करताना दिसत आहे . काहींना मात्र केंद्र सरकारच्या या धाडसत्राच्या मागे भाजप सरकारचा राजकीय अजेंडा असल्याचा संशय येत आहे .

केंद्राची सत्ता ज्यांच्या ताब्यात आहे त्या भाजपचे विचार काय आहेत हे देशाला नव्याने समजून घेण्याची गरज नाही . हिंदू-मुस्लिम बाबतही त्यांचे विचार जगजाहीर आहेत मात्र याच भाजपणे पैगंबर मोहम्मद यांच्या बाबत अनुचित उद्गार काढणाऱ्या आपल्या राष्ट्रीय प्रवक्त्याला तात्काळ पक्षातून आणि पदावरून काढले याकडे डोळेझाक करता येणार नाही . भाजपला खरोखर धार्मिक तेढ वाढवायची असती तर त्यांनी इस्लामवर टीका करणाऱ्या आपल्या लोकांना नक्कीच पाठीशी घातले असते मात्र तसे होताना दिसत नाही . आपला देश कोणत्याही धर्माचे उदात्तीकरण करू शकत नाही , भारताचा देश म्हणून कोणताही धर्म असू शकत नाही म्हणून एकदा देशाच्या संवैधानिक पदांवर बसणाऱ्या व्यक्तीला मग ती कोणत्याही पक्षाची असो संविधानाची चौकट ओलांडून पुढे जात येणार नाही . सत्तेवर येण्यापूर्वी भाजपने धार्मिक मेळाव्यात भलेही काहीही वक्तव्ये केली असतील मात्र सत्तेवर बसल्यावर काही बंधने पाळावीच लागतात . पीएफआय या संघटनेच्या निमित्ताने काही प्रश्न निर्माण झाले आहेत . गेली तीन वर्ष उत्तर प्रदेश मधील भाजप सरकार पीएफआयवर बंदी आणण्याची मागणी करीत असताना केंद्र सरकार कशाची वाट बघत आहे ? गेल्या काही वर्षात ही संघटना असंख्य गुन्ह्यात सहभागी असताना किमान भाजपशासित राज्यात तरी तिच्यावर बंदी का येऊ शकली नाही ? केरळ आणि कर्नाटकच्या काँग्रेस मुख्यमंत्र्यांनी बंदीची मागणी केल्यावर तत्कालीन काँग्रेस सरकारने या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या कारण काँग्रेसला मुस्लिम मतांची गरज असते त्यासाठी मुस्लिम अनुनय करणे त्यांची मजबुरी आहे परंतु भाजप का त्या मार्गाने जातोय ? याचे उत्तर सामान्य माणसाला मिळाले पाहिजे . पीएफआय आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची तुलना केली तर दोघांमध्ये बरेच साम्य दिसते . दोघांनाही आपल्या धर्माचे राज्य देशात आणायचे आहे आणि त्यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी असणारे जिहादी आणि कडवट लोक तयार केले जात आहेत .

# वीज कायदा कसा बदलेल?

**गेली दोन दशके अस्तित्वात असलेल्या विद्युत कायद्यात २००३ काही बदल करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.**

या काळात विद्युत क्षेत्रात अनेक महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. उदाहरणार्थ, २००३ साली नगण्य असलेली सौर ऊर्जा क्षमता आता एकूण ऊर्जा निर्मिती क्षमता वाढीमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावत आहे. अक्षय ऊर्जेच्या वाढत्या क्षमतेचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रीड पातळीवरील 'ऊर्जा संचय' (एनर्जी स्टोरेज) प्रणालीसारखे नवीन तंत्रज्ञानही आता व्यापारीकरणाकडे वाटचाल करत आहे. वीज खरेदी करण्यासाठी मोठे ग्राहक मुक्त प्रवेश धोरणाचा वापर करू शकतात; मात्र विद्युत क्षेत्रातील आर्थिक व्यवहार्यतेची समस्या बघता विशेषतः वितरण क्षेत्राला अजूनही वेळोवेळी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त आर्थिक मदतीची आवश्यकता भासते. गेल्या काही महिन्यात केंद्रीय वीज मंत्रालयाने इतरही अनेक वीज नियम लागू केले आहेत. उदाहरणार्थ, 'लेट पेमेंट सरचार्ज रुल्स'. यामुळे वीज वितरण कंपन्यांना वीज निर्मितीची देयके वेळेत देणे बंधनकारक झाले आहे. विद्युत कायद्यातील प्रस्तावित बदलांकडे बघताना हा व्यापक संदर्भ लक्षात घ्यायची गरज आहे.



कायद्यात प्रस्तावित असलेल्या अनेक दुरुस्त्यांमागचा उद्देश हा सध्याच्या कायद्यातील काही उणिवा दूर करणे आणि न्यायालयीन निर्देश प्रभावीपणे राबवणे हा आहे. नियामक आयोगाच्या आदेशाविरुद्ध केलेले अपील, अपील न्यायाधीकरणाकडे (अपील ट्रिब्युनल किंवा ॲप्टेलकडे) जाते. ॲप्टेलकडे सध्या पुष्कळ खटले दाखल झाले असून, वीजदराच्या संबंधीचे आदेश, वीजखरेदी कराराच्या संबंधीचे वादविवाद आणि विविध अटी व नियमांचे अर्थ लावणे अशा महत्त्वाच्या बाबींवरील निकालांना विलंब लागतो. त्यामुळे एकंदर निर्णय प्रक्रियेत गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते. तसेच, नियमनाबाबत अनिश्चितता येऊन ग्राहकांना अतिरिक्त व्याजाचा बोजा सहन करावा लागतो. यातून वितरण कंपन्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये भरच पडते. त्या दृष्टीने बघता ॲप्टेलमधील सदस्यसंख्या वाढवून ती कमीत कमी सातवर नेण्याचा प्रस्ताव स्वागतार्ह आहे. त्याच बरोबरीने रिक्त जागांवर वेळेवर भरती करणे, ॲप्टेलच्या न्यायाधीश मंडळांचे कामकाज देशात विविध ठिकाणी परिणामकारकरित्या चालवणे आणि ग्राहकांना परवडणाऱ्या दरात कायदेशीर सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्राहक प्रतिनिधींच्या नेमणुका अनिवार्य करणे तसेच वीजपुरवठ्याची गुणवत्ता व सुरक्षा वाढवण्यासाठी काही अतिरिक्त तरतुदी असत्या तर ते अधिक स्वागतार्ह झाले असते. ऊर्जा साठवण प्रणाली ही वीज यंत्रणेचाच एक भाग असल्याचे स्पष्ट करणे ही आणखी एक प्रस्तावित दुरुस्तीही आवश्यक आहे.

## ||अभंगवाणी||



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### गरिबांची दिवाळी गोड

।मुंबई। महाईन्यूज।

गेली दोन वर्षे करोनाच्या संकटातून सावरलेल्या राज्यातील गोरगरीब जनतेची यंदाची दिवाळी गोड व्हावी, यासाठी शिंदे- फडणवीस सरकारने महत्वपूर्ण योजना आखली आहे. त्यानुसार, दारिद्र्यरेषेखालील सुमारे दीड कोटी कुटुंबांना नाममात्र दरात रवा, चणाडाळ, साखर आणि पामलेत आदी वस्तू देण्यात येणार आहेत. वायदा बाजारातून या वस्तूंची तातडीने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, लवकरच या योजनेवर शिक्कामोर्तब होईल, अशी माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने गेल्या तीन महिन्यांपासून जनतेला खूश करणाऱ्या निर्णयांचा सपाटा लावला आहे. गेली दोन वर्षे करोना निर्बंधांमुळे घरकोंडीत अडकलेल्या जनतेला यंदा सर्वच उत्सव मोठ्या जल्लोषात साजरे करण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आहे. दारिद्र्यरेषेखालील तब्बल एक कोटी ६२ लाख ४२ हजार शिधापत्रिकाधारकांना अल्पदरात दिवाळी फराळासाठी आवश्यक साहित्य दिले जाणार आहे.

# गर्दी जमविण्यासाठी दोन्ही गटांकडून प्रयत्न

## ठाकरे की शिंदे : कुणाच्या बाणाने रावन दहण होणार!

।मुंबई।महाईन्यूज।

दसरा मेळाव्याची शिवसेना व शिंदे गटाने जय्यत तयारी सुरू केली आहे. जास्तीत जास्त गर्दी कशी होईल या दृष्टीने उभय बाजूने प्रयत्न केले जात आहेत. मेळाव्याच्या तयारीसाठी शिवसेनेने प्रसिद्ध केलेल्या चित्रफितीत शिंदे यांना लक्ष्य करण्यात आले, तर शिंदे गटाच्या चित्रफितीत बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणांचा हवाला देत शिवसेनेला टोला लगाविण्यात आला आहे. दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी शिवसेना भवनात



बैठकांचे सत्र सुरू होते. पक्षाचे सचिव मिलिंद नार्वेकर यांनी शिवाजी पार्क मैदानात जाऊन तयारीची पाहणी केली. शिंदे गटानेही वांद्रे-कुर्ला संकुलातील सभास्थळी जोरदार तयारी सुरू केली आहे.

हवामान खात्याने गेल्या आठवड्यात दसरा व त्याच्या आधी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. परिणामी दोन्ही गटांमध्ये अस्वस्थता होती; पण बुधवापर्यंत पाऊस नसल्याचा अंदाज आता हवामान विभागाने व्यक्त केल्याने शिवसेना व शिंदे गटाने सुटकेचा निःश्वास टाकला आहे. सभेच्या तयारीकरिता शिवसेनेच्या वतीने नवीन चित्रफीत सादर करण्यात आली. त्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या जुन्या भाषणांचा हवाला देण्यात आला आहे. ठाकरे कुटुंब संपविण्यास काही जण निघाले आहेत, असे उद्धव ठाकरे यांच्या भाषणाचा त्यात समावेश आहे. तर विश्वासदर्शक ठरावाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत केलेल्या भाषणाची चित्रफीत शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी प्रसिद्ध केली. त्यात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार शरद पवार यांनी पाडले होते या बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणाचा उल्लेख करण्यात आला आहे. गेले आठवडाभर चित्रफितीच्या माध्यमातून दोन्ही बाजूने परस्परांवर चिखलफेक केली जात आहे.

## माजी गृहमंत्री अनिल देशमुखांना दिलासा

### ११ महिन्यांनंतर जामीन मंजूर

**मुंबई :** कथीत १०० कोटी वसुली प्रकरणी गेल्या ११ महिन्यांपासून 'ईडी' कोठडीत असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना आज अखेर जामीन मंजूर झाला आहे. मात्र, असे असले तरी भ्रष्टाचाराच्या आरोपाप्रकरणी सीबीआयने दाखल केलेल्या गुन्ह्यात



त्यांना जामीन मिळालेला नाही. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांतर्गत जामीन मिळूनही देशमुख यांना कारागृहातच राहावे लागणार आहे. गेल्या वर्षी २ नोव्हेंबररोजी 'ईडी'ने अनिल देशमुख यांना कथीत १०० कोटी वसुली प्रकरणी अटक केली होती. गेल्या ११ महिन्यांपासून ते 'ईडी' कोठडीत होते. यादरम्यान, त्यांनी जामिनासाठीही प्रयत्न केला होता, पण त्यांना जामीन मिळू शकला नव्हता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकलपीठाने बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी याप्रकरणी दिलेल्या जबाबाच्या विश्वासार्हतेवर यावेळी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. न्यायालयाने देशमुख यांना एक लाख रुपयांच्या हमीवर जामीन मंजूर केला.

## श्री धुंदीबाबा विद्यालय, विद्यानगरमध्ये

# "ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम" अंतर्गत कार्यशाळा उत्साहात!

## रिऍलिटी प्रोजेक्ट इंडियाचे वरिष्ठ शिक्षण अधिकारी गणेश सातव यांचे शिक्षकांना मार्गदर्शन

।सातारा। ।महाईन्यूज।

**दि क्लायमेट रिऍलिटी प्रोजेक्ट इंडिया, नवी दिल्ली या संस्थेच्या माध्यमातून 'ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम' हा गेल्या दीड वर्षापासून रयत शिक्षण संस्थेच्या विविध शाळा व कॉलेजमध्ये राबविला जात आहे. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश हा शिक्षक व विद्यार्थ्यांना हवामान बदल म्हणजे काय हे शास्त्रीयदृष्ट्या विद्यार्थ्यांसह पालकांना, शिक्षकांना समजावून सांगणे व प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून त्यावरती उपाययोजना करणे व त्यांना याबाबत जागृत करणे होय. ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम अंतर्गत हवेची गुणवत्ता, जैवविविधता, उर्जा, पाणी व कचरा व्यवस्थापन या विषयावर शाळा व समुदाय पातळीवर काम केले जात आहे. या विषयांवर काम करून शाळा व कॉलेजमधील कार्बनचे उत्सर्जन शून्य करण्याचा प्रयत्न ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम करत आहे.**





ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम अंतर्गत दि 22 ऑगस्ट 2022 रोजी श्री. धुंदिबाबा विद्यालय विद्यानगरमध्ये शिक्षक प्रशिक्षण उपक्रम उत्साहात पार पडला. यामध्ये क्लायमेट रिऍलिटी प्रोजेक्ट इंडियाचे वरिष्ठ शिक्षण अधिकारी गणेश सातव यांनी शिक्षकांना हवामान बदल – शास्त्र, परिणाम व उपाय यावरती सादरीकरण देवून विषय सविस्तर समजावून सांगितला. याचबरोबर ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम अंतर्गत शाळा व समुदाय पातळीवर काम कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक टी. बी. जाधव सर, "ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम" शाखा समन्वयक सुनील लांडे तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.


मानवाच्या विविध कृतींमधून वातावरणामध्ये कार्बनचे मोठ्या प्रमाणात उत्सर्जन होत आहे. वातावरणातील कार्बनचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे जागतिक तापमान वाढ व हवामान बदल होत असल्याचा प्रत्यय आपणा सर्वांनाच येत आहे. मोठ्या प्रमाणात उष्णतेत होणारी वाढ, भीषण दुष्काळ, अतिरिक्त पाऊस व चक्रीवादळे हे याचेच परिणाम होय. समाजातील प्रत्येक घटकाने हवामान बदल व त्यामुळे होणारे परिणाम थांबविण्यासाठी त्वरित क्रिया करणे आवश्यक आहे. पुढच्या पिढीला स्वच्छ नैसर्गिक स्त्रोत उपलब्ध करून देणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे, अशी माहिती "ग्रीन कॅम्पस प्रोग्रॅम" समन्वयक सुनील लांडे यांनी महाईन्यूजला दिली.

# पहाडी, गुज्जर, बकरवाल समाजाला लवकरच आरक्षण!

## गृहमंत्री अमित शाहांची जम्मू काश्मीरात घोषणा

।राजस्थान ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

जम्मू काश्मीरातील पहाडी समाज, गुज्जर आणि बकरवाल समाजाला अनुसूचित जमातीमधून (एसटी) शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण दिले जाईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली आहे. पहाडी समाजाला अनुसूचित जातीचा दर्जा मिळाल्यास एका भाषिक गटाला आरक्षण देण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे. यासाठी केंद्र सरकारला संसदेत आरक्षण कायद्यात सुधारणा करावी लागणार आहे. दरम्यान, आरक्षणाचा वापर करून भाजपाकडून समाजांमध्ये फूट पाडण्याचे काम केले जात असल्याचा आरोप पीडीपीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी केला आहे. "गुज्जर, बकरवाल आणि पहाडी समाजाच्या आरक्षणासाठी आयोगाचा अहवाल प्राप्त झाला आहे. हे आरक्षण या समाजांना



लवकरच देण्यात येईल", असे आश्वासन जम्मू काश्मीरातील राजौरीमधील सभेत बोलताना शाह यांनी दिले आहे. जम्मू काश्मीरातून कलम ३७० हटवल्यानंतरच हे आरक्षण देणे शक्य होत आहे. यामुळे अल्पसंख्याक, दलित, आदिवासी आणि पहाडी समाजाला त्यांचे हक्क मिळणार आहेत, असे शाह यांनी म्हटले आहे. ५ ऑगस्ट २०१९ मध्ये कलम ३५ (अ) आणि ३७० हटवल्यानंतर काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेण्यात आला आहे. यामुळे जम्मू काश्मीरला स्वायत्तता मिळाली असून त्याबाबत येथील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार

**दरम्यान, आरक्षणाचा वापर करून भाजपाकडून समाजांमध्ये फूट पाडण्याचे काम केले जात असल्याचा आरोप पीडीपीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी केला आहे. "गुज्जर, बकरवाल आणि पहाडी समाजाच्या आरक्षणासाठी आयोगाचा अहवाल प्राप्त झाला आहे. हे आरक्षण या समाजांना लवकरच देण्यात येईल", असे आश्वासन जम्मू काश्मीरातील राजौरीमधील सभेत बोलताना शाह यांनी दिले आहे. जम्मू काश्मीरातून कलम ३७० हटवल्यानंतरच हे आरक्षण देणे शक्य होत आहे. यामुळे अल्पसंख्याक, दलित, आदिवासी आणि पहाडी समाजाला त्यांचे हक्क मिळणार आहेत, असे शाह यांनी म्हटले आहे. ५ ऑगस्ट २०१९ मध्ये कलम ३५ (अ) आणि ३७० हटवल्यानंतर काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेण्यात आला आहे. यामुळे जम्मू काश्मीरला स्वायत्तता मिळाली असून त्याबाबत येथील जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानायला हवेत, असे गृहमंत्री या सभेत म्हणाले आहेत.**

मानायला हवेत, असे गृहमंत्री या सभेत म्हणाले आहेत.

जम्मू काश्मीरवर अधिकार गाजवणाऱ्या तीन कुटुंबियांच्या तावडीतून या राज्याची सुटका करा, असे आवाहन शाह यांनी काश्मीरी जनतेला केले आहे. शाह यांनी या सभेत अप्रत्यक्षपणे मेहबुबा मुफ्ती आणि फारुख अब्दुल्ला यांच्यावर निशाणा साधला आहे. केंद्र सरकारकडून पाठवण्यात येणारा पैसा पूर्वी काही जणांकडून हडपला जायचा, असा आरोप शाह यांनी केला आहे. आता हा पैसा लोक कल्याणासाठी खर्च होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मोदी सरकारने दहशतवाद्यांविरोधात केलेल्या कारवाईनंतर जम्मू काश्मीरातील परिस्थिती सुधारली असल्याचा दावा गृहमंत्र्यांनी केला आहे.

# उत्तराखंडमध्ये हिमस्खलन झाल्याने १० जणांचा मृत्यू, १८ जण अजूनही बेपत्ता!

## लष्कर आणि ITBP कडून बचावकार्य सुरू



।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे मोठी दुर्घटना घडली आहे. द्रौपदी का डांडा-२ शिखराजवळ झालेल्या हिमस्खलनामुळे १० जणांचा मृत्यू झाला आहे. १८ जण अद्यापही बेपत्ता असून बचावकार्य सुरु आहे. हे सर्वजण उत्तरकाशीच्या नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंगच्या ट्रेकिंग ग्रुपचा भाग होते. यामध्ये ३३ प्रशिक्षणार्थी आणि सात प्रशिक्षकांचा समावेश होता. घटनेची माहिती मिळताच एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथकं घटनास्थळी बचावकार्यासाठी रवाना झाली. भारतीय हवाई दलाने बचावकार्यासाठी दोन चिता हेलिकॉप्टर्स तैनात केले आहेत.

जिल्हा प्रशासन, एनडीआरएफ, एसडीआरएफ, भारतीय लष्कर आणि आयटीबीपी अधिकारी सध्या बचावकार्यात सहभागी आहेत. मुख्यमंत्री धामी यांनी ट्वीट करत दिलेल्या माहितीनुसार "हिमस्खलन झाल्याने नेहरु माऊंटेनिअरिंग इन्स्टिट्यूटचे प्रशिक्षणार्थी अडकले आहेत. मी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे लष्कराच्या मदतीने वेगाने बचावकार्य करण्यासाठी विनंती केली आहे. त्यांनी केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत केली जाईल असं आश्वासन दिलं आहे. सर्वांना सुरक्षित बाहेर काढण्याचा प्रयत्न आहे".

# खरगेंच्या पाठीशी नेत्यांचे बळ; लढाई की देखावा?

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

मल्लिकार्जुन खरगे विरुद्ध शशी शरूर या दक्षिणेतीलच दोन नेत्यांमध्ये कॉंग्रेस अध्यक्षपदाची लढत १७ ऑक्टोबरला होत आहे. त्यामुळे २५ वर्षांनंतर पक्षाचे अध्यक्षपद गांधी घराण्याच्या बाहेरील व्यक्तीकडे येणार आहे. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत गांधी कुटुंबाचा कुणालाही पाठिंबा नाही हे वारंवार सांगितले जात आहे. मात्र खरगे यांच्या सुचक-अनुमोदक यादीकडे पाहता पक्षश्रेष्ठींचा कल लक्षात येतो. त्यामुळेच या लढतीची केवळ औपचारिकता आहे. प्रश्न इतकाच आहे की एकूण नऊ हजार मतदारांपैकी थरूर किती मते घेणार? निष्ठावंत व अनुभवी खरगे...



कर्नाटकमधील मल्लिकार्जुन खरगे हे नऊ वेळा आमदार तर दोनदा लोकसभेवर निवडून आले आहेत. १९६०पासून ते राजकारणात आहेत. देवराज अरस यांच्यापासून कर्नाटकमधील बहुसंख्य कॉंग्रेस मंत्रिमंडळात त्यांनी महत्त्वाची खाती सांभाळली आहेत. मुख्यमंत्रीपदाने मात्र त्यांना नेहमीच हुलकावणी दिली आहे. इंदिरा गांधी यांच्यापासून त्यांनी पक्ष संघटनेत काम केले आहे. शांत, संयमी व्यक्तिमत्त्व, विरोधकांशी उत्तम समन्वय ही त्यांची बलस्थाने आहेत. मात्र ८० वर्षीय खरगे २०२४मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापुढे आव्हान उभे करतील काय, हा प्रश्न आहे. कर्नाटकमध्ये पुढील वर्षी निवडणूक आहे.

त्या दृष्टीने खरगेंची उमेदवारी कॉंग्रेसला उपयोगी पडू शकते. कर्नाटकमध्ये कॉंग्रेसची स्थिती चांगली आहे. उत्तर भारतात कॉंग्रेस कमकुवत आहे. उत्तर प्रदेशमध्ये सोनिया गांधी प्रतिनिधित्व करीत असलेली रायबरेली ही एकमेव जागा पक्षाकडे आहे. बिहारमध्ये संयुक्त जनता तसेच राष्ट्रीय जनता दल आघाडीत काही जागा जिंकण्याची कॉंग्रेसला अपेक्षा आहे.

उत्तर भारतातून खरगे यांच्या करिष्म्यावर कॉंग्रेसला मते मिळण्याची शक्यता कमी आहे. त्या तुलनेत मध्य प्रदेशातील ज्येष्ठ नेते कमलनाथ प्रभावी आहेत. उद्योगजगताशी त्यांचा उत्तम स्नेह आहे. याखेरीज सातत्याने लोकसभेवर ते विजयी झाले आहेत. मात्र मध्य प्रदेशचे राजकारण सोडायचे नसल्याने कमलनाथ यांनी पक्षाध्यक्षपदासाठी नकार दिल्याचे सांगितले जाते. खरगे यांच्या पाठीशी 'जी-२३' म्हणून बंडखोर मानले जाणारे अनेक नेते आहेत. त्या अर्थाने खरगे सर्वसंमतीचे उमेदवार ठरले आहेत. राज्यसभेतही विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची कामगिरी उजवी आहे.

### थरूर यांचे वक्तृत्व प्रभावी...

**सफाईदार इंग्रजी, माध्यमांशी उत्तम स्नेह अशा गुणांमुळे साहित्य वर्तुळ तसेच तरुणांमध्ये शशी शरूर लोकप्रिय आहेत. केरळच्या तिरुवनंतपुरममधून दोनदा ते लोकसभेवर निवडून आले आहेत. आंतरराष्ट्रीय विषयांचा त्यांचा अभ्यास आहे. केरळमधील अनेक नेते त्यांच्या पाठीशी आहेत, पण व्यापक पाठिंबा त्यांना मिळताना दिसत नाही. कॉंग्रेसमधील जुने तसेच गांधी घराण्याशी एकनिष्ठ असलेले बहुतेक नेते खरगे यांच्या मागे आहेत. थरूर प्रचारासाठी नागपूरला दोन दिवसांपूर्वी आले होते, तेव्हा आशीष देशमुख यांचा अपवाद वगळता इतर नेते गैरहजर होते. त्यामुळे थरूर यांची वाट अवघड असल्याचे स्पष्ट आहे. खरगेंप्रमाणे थरूर हेही व्यापक जनाधार असलेले नेते नाहीत. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी थरूर यांचे वर्णन उच्चभ्रू असे करत विरोध सूचित केला आहे.**

### अंतर्गत लोकशाही आहे का?

**अध्यक्षपदाच्या निवडणुकीत प्रचार करण्यासाठी गौरव वल्लभ यांच्यासारख्या नेत्यांनी प्रवक्तेपद सोडल्याचे खरगेंनी सांगितले. मुळात पक्षांतर्गत निवडणुकीत याची गरज आहे काय? प्रवक्ता हा पक्षाची बाजू मांडतो. या निवडणुकीत कुणावर अंतर्गत टीका-टिप्पणी करण्याचा विषय नाही. त्यामुळे अशी भूमिका अनाकलनीय आहे. निवडणुकीनंतर थरूर यांच्याबरोबर काम करणार असल्याचे खरगेंनी स्पष्ट केले आहे. भाजपपेक्षा आमचा पक्ष खरा लोकशाहीवादी आहे. त्यामुळे आमच्या अध्यक्षीय निवडीबाबत माध्यमात जरा जास्तच चर्चा सुरू आहे, असा कॉंग्रेस नेत्यांचा सूर आहे.**

# उर्मिला मातोंडकरने ५ वर्षात नाकारले ५० हून अधिक चित्रपट, कारण...

'उर्मिला मातोंडकरने ५ वर्षात नाकारले ५० हून अधिक चित्रपट, कारण... या सीरिजचे पोस्टर तिने सोशल मीडियावर शेअर केले आहे.

नव्वदीच्या दशकातील टॉपची अभिनेत्री उर्मिला मातोंडकर तिच्या आगामी वेबसीरिजसाठी खूप उत्सुक आहे. गेल्या काही वर्षांपासून ती सिनेक्षेत्रापासून लांब होती. २०१४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आजोबा' या मराठी चित्रपटामध्ये ती दिसली होती. बऱ्याच वर्षांच्या कालावधीनंतर ती छोट्या पडद्यावरच्या 'डीआयडी सुपरमॉम्स' या रिॲलिटी शो झळकली. कार्यक्रमामध्ये उर्मिलाने परिक्षक म्हणून काम केले.

'तिवारी' या वेबसीरिजच्या माध्यमातून उर्मिला मातोंडकर ओटीटी विश्वामध्ये पदार्पण करणार आहे. या सीरिजचे पोस्टर तिने सोशल मीडियावर शेअर केले आहे. या पोस्टरवरुन ही एक ॲक्शनपॅक सीरिज असल्याचे लक्षात येत आहे. आई-मुलीच्या नात्यावर आधारित या सीरिजचे दिग्दर्शन सौरभ वर्मा करणार आहे. उर्मिला यांच्यासह काम करण्याचा अनुभव शेअर करताना तो म्हणाला की, "उर्मिला यांना गेल्या काही वर्षांमध्ये अनेक चित्रपटांच्या ऑफर्स आल्या होत्या. पण त्यांना घाई करायची नव्हती. त्या आता ओटीटी विश्वामध्ये पदार्पण करणार आहेत. या सीरिजमधील काही सीन्स आम्ही भोपालमधील प्रत्यक्ष ठिकाणांवर जाऊन चित्रीकरण करणार आहोत. त्यांनी या क्षेत्रामध्ये खूप नाव कमावले आहे. त्यांच्यासह काम करताना त्या प्रतिमेला धक्का न पोहोचवण्याची जबाबदारी माझ्यावर आहे"



# 'हर हर महादेव'मध्ये बाजीप्रभूंच्या करारी भूमिकेत अभिनेता शरद केळकर

'झी स्टुडिओज'ची निर्मिती असलेल्या आणि अभिजित देशपांडे यांच्या दिग्दर्शनाने सजलेल्या 'हर हर महादेव' या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांच्या मनात प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. हरहुन्नरी अभिनेता सुबोध भावे चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार हे जाहीर झाल्यानंतर या चित्रपटाची उत्कंठा वाढवणारे आणखी एक पोस्टर प्रकाशित करण्यात आले आहे. मराठी झ्र हिंदी चित्रपट आणि वेबमालिकांमध्ये विविधांगी भूमिका साकारणारा अभिनेता शरद केळकर या चित्रपटात बाजीप्रभू देशपांडेंची



करारी व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहे. येत्या दिवाळीत हा चित्रपट झी स्टुडिओजच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'हर हर महादेव' ही केवळ गर्जना नव्हती तर ती छत्रपतींच्या स्वराज्यासाठी लढणाऱ्या मावळ्यांचा महामंत्र होता. समोरचा गनिम कितीही शक्तिशाली असो त्याला सळो की पळो करून सोडण्यासाठीची ऊर्जा निर्माण करणारी, मावळ्यांना नवी उमेद देणारी शिवगर्जना म्हणजे हर हर महादेव. हाच हर हर महादेवचा महामंत्र जपत बाजीप्रभू देशपांडे यांनी सिद्दी जौहरच्या सैन्याविरुद्ध घोडिखड लढवली आणि आपल्या प्राणांची आहुती देत घोडिखड पावन केली. बाजीप्रभूंच्या याच लढवय्या करारी बाण्याची गाथा अतिशय भव्य दिव्य स्वरूपात 'हर हर महादेव' या चित्रपटात दिसणार आहे.

# कतरिनाला पाहून प्रेक्षकांची उडणार घाबरगुंडी

बॉलिवूडमध्ये गेली काही वर्षे वेगवेगळे भयपट बनले आणि प्रेक्षकांनी त्यांना चांगला प्रतिसाद दिला. 'स्त्री', 'रूही' अशा काही चित्रपटातून केलेला वेगळा प्रयत्न प्रेक्षकांनी उचलून धरला आहे. आता पुन्हा एक असाच भयपट प्रेक्षकांची झोप उडवायला सज्ज आहे. एक्सेल एंटरटेनमेंट्च्या बहुप्रतिक्षित हॉरर-कॉमेडी 'फोन भूत' हा



चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये कतरीना कैफ भूताची भूमिका साकारताना दिसणार आहे. कतरीनाबरोबर या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी आणि ईशान खट्टरही महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# "माझी भूमिका तुम्हाला..." आदिपुरुष चित्रपटातील भूमिकेबद्दल क्रिती सेनॉनची स्पष्ट प्रतिक्रिया




२ ऑक्टोबर रोजी दाक्षिणात्य अभिनेता प्रभासाचा बहुचर्चित 'आदिपुरुष' चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला. या टिझरच्या प्रदर्शनासाठी भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन अयोध्येमध्ये करण्यात आले होते. चित्रपटाचा टिझर युट्यूबवर प्रदर्शित झाल्यानंतर सोशल मीडियावर टिझरला मोठ्या प्रमाणावर ट्रोल करण्यात आले. चित्रपटातील व्हीएफएक्स, सैफ अली खानने साकारलेल पात्र यावरून सोशल मीडियावर आता मिम्स फिरू लागले आहेत. मात्र चित्रपटातील कलाकार टिझर प्रदर्शित होण्याआधी भावुक झाले होते.

टिझर प्रदर्शित होण्याआधी अभिनेत्री क्रिती सॅनॉन माध्यमांशी संवाद साधताना म्हणाली, 'मी स्वतःला खूप भाग्यवान समजते खूप कमी अभिनेत्रींना अशा प्रकारच्या चित्रपटात काम करण्याची संधी मिळते. माझ्या आयुष्यात मला ही भूमिका खूप लवकर मिळाली आहे.

# अली फजल, रिचा चड्ढा दोन वर्षांपूर्वीच विवाहबंधनात अडकले होते?


बॉलिवूडचे कलाकार त्यांच्या चित्रपटामुळे कायमच चर्चेत असतात. चित्रपटांच्या बरोबरीने त्यांचे आयुष्यदेखील बरेच चर्चेत असते. नुकतेच आलिया भट्ट रणबीर कपूर विवाहबद्ध झाले आहेत. सध्या बॉलिवूडमधील आणखीन एक जोडपं चर्चेत आहे. अली फजल, रिचा चड्डा या दोघांनी नुकतीच काही दिवसांपूर्वी आपल्या लग्नाची पत्रिका सोशल मीडियावर शेअर केली होती. या हटके पत्रिकेची चर्चा सर्वत्र झाली होती. नुकतेच त्यांनी प्री वेडिंगचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. मात्र त्यांच्या लग्नाच्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. अली फझल, रिचा चड्ढाच्या प्रवक्त्याने माध्यमांना असं सांगितलं की 'या दोघांनी अडीच वर्षांपूर्वी कायदेशीर लग्न केले आहे. सध्या ते आपल्या मित्र मैत्रीण, कुटुंबाबरोबर हा लग्नसोहळा साजरा करत आहेत. आपल्या लग्नाच्या निमित्ताने स्वागत समारंभ सोहळा दिल्ली, लखनौ येथे ठेवला आहे. शेवटचा स्वागत समारंभ सोहळा हा मुंबईत असणार आहे'. प्रवक्ता पुढे म्हणाला 'या दोघांना लग्न पंजाबी, लखनौ पद्धतीने करायचे होते. या सोहळ्यात त्यांनी जे कपडे, दागिने परिधान केले आहेत ते विशिष्ट पद्धतीने बनवले गेले आहेत. त्यांच्या प्रेमकथेला साजेसे असे डिझाईन करण्यात आले आहेत. लग्नपत्रिकेपासून ते प्री वेडिंगपर्यंत



त्यांच्या प्रत्येक गोष्टीची आज चर्चा आहे. दोघे सोशल मीडियावर कायम सक्रिय असतात.

## शॉर्ट न्यूज »

### टीम इंडिया आफ्रिकेला व्हाईट वॉश देणार?



।इंडोनेशिया। महाईन्यूज

भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसऱ्या आणि अखेरच्या टी२० सामन्यात भारतीय संघ आजचा सामना जिंकून निर्भेळ यश मिळवण्याचा प्रयत्न करेल. टी२०विश्वचषकापूर्वी हा टीम इंडियाचा शेवटचा सामना असणार आहे. त्यामुळे हा सामना जिंकून थेट विश्वचषकात सामील व्हायचे असा रोहित अॅण्ड कंपनीचा इरादा असेल. विराट आणि केएल राहुलसह अनेक महत्त्वाच्या खेळाडूंना शेवटच्या सामन्यातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे राखीव खेळाडूंना संघात खेळण्याची मोठी संधी आहे. भारत या मालिकेत २-०ने आघाडीवर असून तिसरा जिंकत मालिकेत दक्षिण आफ्रिकेला क्लीन स्वीप देण्याचा भारताचा हेतू असणार आहे. श्रेयस अय्यर याला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या वनडे मालिकेसाठी भारताचा उपकर्णधार म्हणून नियुक्त केले आहे.

# रिले रॉसो चमकला!

## भारताचा दक्षिण आफ्रिकेकडून 57 धावांनी पराभव

।अहमदाबाद । महाईन्यूज ।

इंदोर येथे भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका संघातील तिसरा टी२० सामना पार पडला. तीन सामन्यांच्या टी२० मालिकेतील हा शेवटचा सामना दक्षिण आफ्रिकेने ४९ धावांनी जिंकला. पहिल्या दोन सामन्यात भारताकडून पराभूत झाल्यानंतर पाहुण्या संघाने तिसऱ्या सामन्यात दमदार पुनरागमन केले.भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील तिसऱ्या आणि अखेरच्या टी२० सामन्यात भारतीय संघ आजचा सामना जिंकून निर्भेळ यश मिळवण्याचा प्रयत्न करेल असे वाटत असताना मात्र भारताने शेवटचा सामना गमावला. मोहम्मद सिराजला बाद करत दक्षिण आफ्रिकेने भारतावर ४९ धावांनी विजय मिळवला. टी२० विश्वचषकापूर्वी हा टीम इंडियाचा शेवटचा सामना होता. रिले रॉसोला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला तर सुर्यकुमार यादव हा मालिकावीराचा मानकरी ठरला.



भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्या पॉवर प्ले नंतर दक्षिण आफ्रिकेने सावध सुरुवात केली. कर्णधार टेम्बा बावुमाला उमेश यादवने बाद केले. क्विंटन डी कॉकची शानदार फलंदाजी सुरु असताना त्याला दुसऱ्यांदा जीवदान मिळाले. सिराजने त्याचा झेल सोडला. रिले रॉसो आणि डी कॉक यांच्यात अर्धशतकी भागीदारी झाली. त्याने ३३ चेंडूत ५३ धावा करत स्वतःचे ही अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेला दुसरा मोठा धक्का बसला. क्विंटन डी कॉक ४३ चेंडूत ६८ धावा करून बाद झाला. श्रेयस अय्यरने त्याला धावबाद केले. शेवटच्या सामन्यात रिले रॉसोने शानदार शतक पूर्ण करत ४८ चेंडूत १०० धावा केल्या. यामध्ये ७ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश होता. त्याच्या या शतकाने दक्षिण आफ्रिकने २०० धावांचा टप्पा पार केला असून भारतासमोर विजयासाठी २२८ धावांचे आव्हान ठेवले आहे. त्याच्याव्यतिरिक्त दक्षिण आफ्रिकेकडून क्विंटन डी कॉक याने ४३ चेंडूत ६८ धावांची खेळी केली. दुसरीकडे, ट्रिस्टन स्टब्स (२३धावा) आणि डेव्हिड मिलर (१९ धावा) यांनीही खारीचा वाटा उचलला.

भारतीय संघाची धावांचा पाठलाग करताना खराब सुरुवात झाली. कर्णधार रोहित शर्मा भोपळाही न फोडता तंबूत परतला. विराटच्या जागी श्रेयस अय्यरला स्थान मिळाले होते पण त्याचा फायदा मात्र त्याला उठवता आला नाही. एकापाठोपाठ एक गडी बाद होत गेल्याने भारतीय संघाला मोठी भागीदारी करता आली नाही. सगळेच फलंदाज हे फटके मारण्याच्या नादात बाद झाले. फलंदाजीसाठी अनुकूल असणाऱ्या खेळपट्टीवर एकही फलंदाज टिकू शकला नाही.

# आशिया चषकात महिला ब्रिगेडचा सलग तिसरा विजय

## युएईचा 104 धावांनी उडवला धुव्वा

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

महिला आशिया चषकात भारतीय संघाचा तिसरा सामना मंगळवारी युएईशी झाला. या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारताने उत्तम सुरूवात केली. या सामन्यासाठी कर्णधार हरमनप्रीत कौर हिला आजच्या सामन्यात विश्रांती देण्यात आली. त्यामुळे संघाची धुरा मराठमोळ्या स्मृती मंधानाच्या खांद्यावर सोपवण्यात आली. भारताची सुरुवात फार खराब झाली. जेमीमाह रोड्रिगेझने ४५ चेंडूत ७५ धावा केल्याने तिला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. या आशिया चषकातील तिचा हा दुसरा सामनावीराचा किताब आहे.

एस मेघना आणि रिचा घोष या लवकर बाद झाल्या. रिचाला तर भोपळाही फोडता आला नाही. तर मेघना १० धावा करून बाद झाली. १९ धावांवर तीन गडी बाद झाले होते. मात्र त्यानंतर आलेल्या दीप्ती शर्मा आणि जेमिमा यांच्यात १२९ धावांची भागीदारी झाली. यावेळी भारताने २० षटकात ५ गडी गमावत १७८ धावांचा डोंगर उभारला आहे. पण धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या युएईने २० षटकात ४ गड्यांच्या मोबाल्यात ७४ धावांच करू शकली.



दुपारनंतर दुसऱ्या डावात पावसाची शक्यता असल्याने भारतीय कर्णधार हरमनप्रीतने राजेश्वरी गायकवाड व दीप्ती शर्मा या दोन्ही फिरकी गोलंदाजांकडून गोलंदाजीची सुरुवात केली. ५.२ षटकांचा खेळ झाल्यानंतर पाऊस आल्याने सामना थांबवावा लागला. पाऊस न ओसरल्याने कमीत कमी पाच षटकांचा खेळ झाला असल्यामुळे, भारतीय संघाला डकवर्थ लुईस नियमानुसार ३० धावांनी विजयी घोषित केले. भारतीय संघाला पुढील सामना युएईविरूद्ध खेळायचा आहे. त्यानंतर पाकिस्तान व बांगलादेश विरुद्ध अखेरचे दोन सामने खेळले जातील.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही